# येशूने त्याची सुवार्ता इतरांना सांगण्यास आपल्या शिष्यांना सांगितले

### साध्या-सोप्या शब्दात सुवार्ता कशी सांगावी हे मुलांना शिकवा.

**प्रार्थना.** ''प्रिय देवा, येशूची सुवार्ता समजावी आणि सांगता यावी याकरीता कृपा करुन त्यांचे साहाय्य कर.''

मुलांसाठीचे कोणतेही किंवा सर्व शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

येशूने मरणातून पुन्हा उठल्यावर कशा प्रकारे सुवार्ता सांगितली त्याचा **कथा** वृत्तांत **लूक** 24:1-8 आणि 36-50 मधून इतरांना थोडक्यात सोप्या संदेशाच्या स्वरुपात सुवार्ता कशी सांगता येते ते ह्या कथावृत्तांतावरुन दिसते.



कथावृत्तांत सांगून झाल्यावर विचारा.

- येशूला मरणातून पुन्हा उठलेले पाहून शिष्यांना भीती का वाटली? *(उत्तर: व. 37)*
- येशूने त्याचे शरीर खरे आहे हे त्यांना कसे दाखवले? *(39-43)*
- येशू विषयीचे भविष्य विषयक संदेश आपल्याला पवित्र शास्त्रात कोठे पहायला मिळतात *(44)*
- ख्रिस्ताच्या बाबतीत काय घडणार ह्या बद्दल शास्त्रलेख काय सांगतात? *(46)*
- येशूने आम्हांला सर्व राष्ट्रांना कशाची घोषणा करण्यास सांगितले? *(47)*
- येशूने त्याच्या शिष्यांना 'वरुन' काय मिळेल असे अभिवचन दिले? *(49)*
- येशू वर स्वर्गात घेतला गेल्यावर शिष्यांनी काय केले? *(52)*

सुवार्तेच्या कथावृत्तांतचे नाट्यीकरण करा.

मुलांकडून नाटिकेची तयारी करुन घ्या. ही नाटिका तुम्हांला लहान करता येईल.

मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात...

- **निवेदक** : कथावृत्तांताचा सारांश करा आणि मुलांना संवाद पाठ करण्यास मदत करा.
- **येशू** : एक टेबल किंवा खुर्ची तयार ठेवा आणि काहीतरी साधे खायला आणून ठेवा.

**लहान मुलांनी शिष्यांच्या भूमिका कराव्यात.**

## नाटिका, भाग 1, लूक 24:36-43

**निवेदक :** वचने 36-43 मधून कथावृत्तांताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''शिष्य काय म्हणतात ते ऐका.''

**शिष्य :** ''येशू जिवंत होईल का?'' ''तो मरणातून परत खरंच जिवंत होईल का?'' ''पेत्र सांगतो की त्याने येशूला पाहिले.'' ''अम्माऊसच्या वाटेवरील दोन शिष्यांनीही त्याला पाहिल्याचे सांगितले!'' ''माझा तर यावर काही विश्वास बसत नाही.'

**येशू :** ''तुम्हांला शांती असो!''

**शिष्य :** घाबरुन गेल्याचा अभिनय करुन भीतीने ओरडा आणि म्हणा, ''अरे हे काय!'' ''हे तर भूत आहे!'' ''मला भीती वाटते!''

**येशू :** ''मी भूत नाही. या, बघा, मला स्पर्श करा. मला काहीतरी खायला द्या. भूत काही खात नाही आणि त्याला हाडमांसाचे शरीर नसते. मला शरीर आहे!''

**शिष्य :** येशूला काहीतरी खावयास द्या. आणि म्हणा, ''बघा, बघा, येशू मासा खात आहे. तो भूत नाही!''

## नाटिका, भाग-2 लूक 24:44-53

**निवेदक :** वचने 44-53 मधून कथावृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''येशू काय म्हणतो ते ऐका''

**येशू :** ''तुम्हांला आश्चर्य का वाटले? हे सर्व माझ्या बाबतीत घडणार असे पवित्र शास्त्रात तुम्हांला सांगितले आहे. मी दु:ख सोसावे, मरावे आणि तिसृया दिवशी मेलेल्यांतून उठावे.''

**शिष्य :** ''हे मोठे अद्‌भूत आहे! आम्हांला हे समजलेच नाही!''

**येशू :** ''आता तुम्ही प्रत्येक राष्ट्रातील लोकांना माझ्या नावाने पश्चात्ताप व पापक्षमा घोषित करा. परंतु माझा पिता आपला आत्मा तुमच्याकडे पाठवे पर्यन्त थांबा म्हणजे तुम्हांला त्याच्या सामर्थ्याने साक्ष देता येईल. चला आपण जाऊ या.''

**सर्वजण :** सर्वजण मिळून काही क्षण चाला.

**येशू :** त्यांना आशीर्वाद देण्यासाठी तुमचे हात उंच करा आणि मग 'स्वर्गात' जा (खुर्ची किंवा टेबलावर चढा).

**शिष्य :** गुडघे टेकून बसा आणि एखादे स्तुतीचे गीत गा. उठून म्हणा, ''येशू प्रभू आहे!'' ''आपण अंत:करणपूर्वक त्याची उपासना आणि सेवा करु!'' ''त्याच्याविषयी आपण प्रत्येकाला सांगू.''

**निवेदक किंवा मोठे मूल :** नाटिकेसाठी मदत करणृाया प्रत्येकाचे आभार माना. मोठयांनी ऐकून घेतले म्हणून त्यांचेही आभार माना.

मंडळीच्या पुढृा;ंशी बोलून मुलांसाठी पुढील गोष्टीची व्यवस्था करा.

- उपासनेमध्ये प्रौढांसमोर नाटिका सादर करा.
- ह्या अभ्यासाच्या आरंभी दिलेले प्रश्न मोठया माणसांना विचारा.
- कविता सादर करा, मुलांनी काढलेली चित्रे दाखवा आणि त्यांनी तयारी केलेला अन्य कार्यक्रम सादर करा.

मुलांना विचारा... ''आपल्याला काही साध्या सोप्या शब्दांमध्ये सुवार्ता कशी सांगता येईल याची काही उदाहरणे कृपा करुन सांगा.'' (ट्रेनमधून जातांना, मित्रांना भेटण्यास जातांना इत्यादी) लोकांना उदाहरणे देऊ द्या.

**वधस्तंभाचे चित्र काढा,** मुलांना ते उतरवून घ्यायला सांगा.



- मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.
- मुलांनी काढलेले चित्र त्यांनी उपासनेच्या वेळी मोठया माणसांना दाखवावे आणि येशूने दु:ख सहन करुन कशा प्रकारे मरण पत्करले हे ह्या चित्रावरुन स्पष्ट करुन सांगा.
- त्यांनी तीन भागांमध्ये सुवार्ता सांगावी.

1. येशूला आमच्या पापांसाठी शिक्षा झाली आणि तो मेला.
2. तो मरणातून पुन्हा उठला आणि सदोदित जिवंत आहे.
3. देव आमच्या पापांची क्षमा करतो आणि आम्हांला नवे जीवन देतो.

**पाठ करा** लूक 24:46-49 मधील सुवार्ता. लहान मुलांना फक्त वचन 46 पाठ करायला सांगा.

**कविता :** तीन मुलांना स्तोत्र 13:3,4 व 5 ह्यातून प्रत्येकी एक वचन म्हणायला सांगा.

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू येशू, शास्त्रलेखात तुझ्याविषयी सांगितल्याप्रमाणे तू आमच्यासाठी दु:ख सोसले आणि मरण पावला. तिसृ;या दिवशी तू मरणातून पुन्हा उठलास. आम्ही पश्चात्ताप केल्यावर तू तुझ्या नावात आमच्या पातकांची क्षमा करतोस. तुझ्या सामर्थ्याने इतरांना सुवार्ता सांगता यावी यासाठी तू आपला आत्मा आमच्याकडे पाठवतोस. तू आम्हांला मोठया आनंदाने परिपूर्ण करतोस.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net